वाचा :-१) श्री.हरिष रावजी पाटील व इतर तर्फे कु.मु.धा. मे.हायसिज प्रॉपर्टीज प्रा.लि. तर्फे भागीदार श्री. अतुल हेमराज मुंदडा व इतर, रा.पर्वती चेंबर्स, संगम प्रेस रोड, १६/१, कोथरुड, पुणे - ३८ यांचा दि.३/६/२०१३ रोजीचा अर्ज.

२) मा.आयुक्त,पुणे विभाग यांचेकडिल परिपत्रक क्र.मह-२/जमीन/जनरल/आरआर/७७२/२००३, दि.२२/९/०३.

३) सहा.संचालक,नगर रचना,पुणे यांचेकडिल जा.क्र.रेखांकन/एनएबीपी/मौ.सुस/ता.मुळशी/स.नं ४५/१/ससंपु/५४७०, दि.२०/९/२०१३

४) प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समुह, पुणे यांचेकडील दिनांक ३ मे, २०११ रोजीचे पत्र.

५)पर्यावरण विभागाकडील पत्र क्रमांक इएनव्ही-२०१०/प्र.क्र.१४४/ता.क्र.३,दिनांक ०५/०२/२०११.

६)महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम १८.

७)नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र.नाजक २२११/प्र.क्र.१३८/नाजकधा-२दि.७/०६/२०११

८)वनसंरक्षक पुणे वनविभाग यांचेकडील दिनांक १४/५/२००९ रोजीचे पत्र.

९)मुख्य अग्निशमन अधिकारी पुणे यांचकडील पत्र क्र.W.No:FB/९३०, दि.१०/७/२०१३.

१०) या कार्यालयाकडील आदेश क्रं.पमअ/एनएएसआर/४४/२००३, दि.२९/७/२००३.

११)पर्यावरण विभागाकडील पत्र क्र.SEAC२०११/CR-७०/TC२, दि.१८/५/२०१३.

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे.
(महसूल शाखा)
क्र.पमअ/एनए/एसआर/३०७/१३
पुणे, दिनांक -२९/१२/२०१३

विषय - मौजे-सुस, ता.मुळशी, जि.पुणे येथील जमीन स.नं.४५/१ पै. मधील क्षेत्र २४१२८-०० चौ.मी. पैकी रस्त्याखालील क्षेत्र २२४-१७ चौ.मी. वजा जाता उर्वरित २३९०३-८३ चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनासाठी बांधकाम आराखडेस मंजुरी मिळणेबाबत.

आदेश,

श्री.हरिष रावजी पाटील व इतर तर्फे कु.मु.धा. मे.हायसिज प्रॉपर्टीज प्रा.लि. तर्फे भागीदार श्री.अतुल हेमराज मुंदडा व इतर यांनी मौजे-सुस, ता.मुळशी, जि.पुणे येथील जमीन स.नं.४५/१ पै. मधील क्षेत्र २४१२८-०० चौ.मी. पैकी रस्त्याखालील क्षेत्र २२४-१७ चौ.मी. वजा जाता उर्वरित २३९०३-८३ चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ बांधकाम नकाशांस परवानगी मिळणे कामी या कार्यालयाकडे दिनांक ३/६/२०१३ रोजी विनंती अर्ज सादर केला आहे.

या कार्यालयाकडील आदेश क्रं.पमअ/एनएएसआर/४४/२००३, दि.२९/७/२००३ अन्वये मौजे-सुस, ता.मुळशी, जि.पुणे येथील स.नं.४५/१ पै. मधील २४१२८-०० चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ

अकृषिक परवानगीसह रेखांकन/बांधकाम नकाशे मंजूर केलेले आहेत. आता अर्जदार यांनी स.नं. ४५/१ पै. मधील क्षेत्र २४१२८-०० चौ.मी. पैकी रस्त्याखालील क्षेत्र २२४-१७ चौ.मी. वजा जाता उर्वरित २३९०३-८३ चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ बांधकाम नकाशास मंजुरी मिळणेबाबत विनंती केली आहे.सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहा.संचालक नगर रचना, पुणे शाखा पुणे यांनी दि.२०/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये सुधारित बांधकाम आराखडयास मंजुरी देणेबाबत शिफारस केलेली आहे.

मौजे सुस, ता.मुळशी, जि.पुणे येथील खालील वर्णनाची जमिन यांचे नांवे हक्कनोंदणीस दाखल असल्याचे दिसुन आले आहे.

अ. क्र.	जमिन मालकाचे नाव	स.नं.	७/१२ नुसार एकुण क्षेत्र (चौ.मी)	बांधकाम करावयाचे क्षेत्र (चौ.मी)
१	हरिष रावजी पाटील निता हरिष पाटील विजय वसंत कुलकर्णी उमा विजय कुलकर्णी	४५/१	१०५००-००	१०५००-००
२	प्रसन्न डेव्हलपर्स तर्फे भागीदार हरिष रावजी पाटील		१३००-००	१३००-००
३	मे प्रसन्न डेव्हलपर्स तर्फे भागीदार रोहन हरिष पाटील		११८००-००	११८००-००
४	उमा विजय कुलकर्णी नीता हरिष पाटील		५२८-००	५२८-००
५	एकूण क्षेत्र		२४१२८-००	२४१२८-००
६	अर्जदार यांनी बांधकाम नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र			२४१२८-००
७	रस्ता रुंदीने व्याप्त क्षेत्र			२२४-१७
८	बांधकाम करावयाचे निवासी क्षेत्र			२३९०३-८३
९	बांधकाम परवानगीचे प्रयोजन			निवासी

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या सर्व हक्कनोंद उतारे, वन विभागाकडिल राखीव वनाची यादी, तहसिल कार्यालय मुळशी यांचा स्थळपाहणी अहवाल व कार्यालयातील ॲलिनेशन रजिस्टर मधील नोंदी यावरुन दिसून येते की,

१. विषयाकित मिळकतीबाबत श्री. हरिष रावजी पाटील , निता हरिष पाटील, विजय वसंत कुलकर्णी, उमा विजय कुलकर्णी हे स.नं.४५/१ क्षेत्र १०५००-०० चौ.मी., प्रसन्न डेव्हलपर्स तर्फे भागीदार हरिष रावजी पाटील हे स.नं. ४५/१ क्षेत्र १३००-०० चौ.मी., मे प्रसन्न डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.रोहन हरीष पाटील हे स.नं.४५/१ क्षेत्र ११८००-०० चौ.मी., व

उमा विजय कुलकर्णी, नीता हरिष पाटील हे स.नं.४५/१ क्षेत्र ५२८-०० चौ.मी. असे एकूण २४१२८-०० चौ.मी. क्षेत्रासाठी त्यांनी अर्जदार कु.मु.धा. मेसर्स हायसीज प्रॉपर्टीज प्रा. लि. तर्फे भागीदार अुतल हेमराज मुंदडा व राहूल हेमराज मुंदडा यांनी अनुक्रमे हवल-४,दस्त क्रमांक-२१७४-२०१०,दि.१०/३/२०१०, हवल-४,दस्त क्रमांक-९०४१-२०१३, दि.१५/१०/२०१३, हवल-४, दस्त क्रमांक ९०४३-२०१३,दि.१५/१०/२०१३ अन्वये कुलमुखत्यारपत्र दिलेले आहे.

२. या कार्यालयातील ॲलिनेशन रजिस्टरमधील नोंदनुसार विषयांकित जमीन वतन/इनाम सवंगातील असल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने सदर मिळकतीबाबत चालू बाजारभावानुसार ५० टक्के नजराणा रक्कम सदर चलनाव्दारे शासन जमा करण्यात आलेली आहे.

३. वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्रं. कक्ष-६/जमीन/११५/२००९-१०,दिनांक १४ मे, २००९ रोजीच्या उपलब्ध यादी व सीडीचे अवलोकन करता सदरची जमीन ही वनसंवर्गापैकी नाही.

४. तहसिल कार्यालय मुळशी यांचेकडील दाखला क्र.जमिन/एसआर/७२/१३, दि.४/१२/२०१३ अन्वये प्रस्तावित क्षेत्रातुन उच्च दाबाची विद्युत वाहिनी जात असल्याचे नमूद केलेले आहे. याबाबत अर्जदार यांनी रु.१००/- स्टॅम्पपेपवर दि.५/१२/२०१३ रोजीचे नोटराईजड हमीपत्र सादर केलेले आहे. सदर हमीपत्रात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

सदर मिळकतीतून लघु दाबाची विद्युत वाहिनी जात असून सदर विद्युत वाहिनीबाबत सबंधित महामंडळाकडून नाहरकत प्रमाणपत्र जोते तपासणी पूर्वी घेईन असे नमूद करुन अर्जदार यांनी हमीपत्र सादर केलेले आहे. सदरचे हमीपत्र अर्जदार यांना बंधनकारक राहील तसेच अर्जदार यांनी विद्युत महामंडळाकडून जोते तपासणी पूर्वी नाहरकत प्रमाणपत्र सादर न केल्यास सदरची बांधकाम परवानगी आदेश आपोआप रद्द होईल.

५. यापूर्वी या कार्यालयाकडील आदेश क्रं.पमअ/एनएएसआर/४४/२००३,दि.२९/७/२००३ अन्वये अकृषिक परवानगीसह रेखांकन/बांधकाम आराखडेस मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच तहसिल कार्यालय मुळशी यांचेकडील दाखला क्र.जमिन/एसआर/७२/१३, दि.४/१२/२०१३ अन्वये सदर मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम अथवा अकृषिक वापर सुरु नसल्याचे नमूद केलेले आहे. त्या अनुषंगाने अकृषिक परवानगी दिलेनंतर मुदतीत वापर न केल्याने रु.१०००/- दंड सदर चलनाव्दारे वसुल करण्यात आलेला आहे. तथापि अर्जदार यांनी आता बांधकाम आराखडयास परवानगी मिळावी म्हणून विनंती केलेली आहे.

६. युएलसीबाबत अभिप्राय :-

नागरी जमिन (कमाल धारणा व विनिमय) अधिनियम, १९७६ निरसित करण्यात येऊन शासनाने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ दिनांक २९/११/२००९ पासुन स्विकृत केलेला आहे.शासनाचे नगरविकास विभागाकडील पत्र क्र.नाजक-१०(२००८)/प्र.क्र.१/२००८/नाजकधा-१, दिनांक ०१ मार्च, २००८ अन्वये "कलम १०(३)/१०(५)/२० व २१ अंतर्गत करण्यात आलेली कार्यवाही वगळता अन्य कलमांतर्गत

झालेल्या कार्यवाहीबबत ना.ज.क.धा.अधिनियमांतर्गत परवानगी आवश्यकता नाही. संबधित जमीन धारकाकडुन/ विकासकाकडुन विकसन परवानगी मागीतलेल्या मिळकती संदर्भात निरसन अधिनियमाच्या संरक्षित कलमांतर्गत त्यांच्या मिळकती संदर्भात कार्यवाही झालेली नाही, या आशयाचे शपथपत्र व बंधपत्र रु.३००/- स्टॅम्पपेपरवर घेण्यात येऊन जमिनीचे हस्तांतरण व विकसनास परवानगी देण्यात यावी" अशी सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार अर्जदार यांनी विहित नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र रु.३००/- चे स्टॅम्पपेपरवर दिनांक १७/१०/२०१३ रोजी सादर केलेले आहे.सादर केलेल्या शपथपत्र व बंधपत्रानुसार विषयांकित मिळकतीबाबत विवरणपत्र दाखल केले नसल्याचे नमूद करून त्यामध्ये प्रश्नाधिन स.नं.४५/१ पै. मधील क्षेत्र २४१२८-०० चौ.मी. क्षेत्र मौजे-सुस, ता-मुळशी येथील अतिरिक्त नसल्याचे प्रतिज्ञापित केले आहे.

प्रस्तुत मिळकतीबाबत युएलसी कायदयातंर्गत अर्जदार यांनी विवरणपत्र दाखल केले होते काय? तसेच कलम १०(३), १०(५) अन्वये कार्यवाही केलेल्या यादीमध्ये तसेच कलम २० अन्वये सुट दिलेल्या, कलम २१ खालील योजनांचे यादीत सदर जमिनीचा समावेश आहे काय? तसेच प्रकरणामध्ये कलम ८ (४) अन्वये निर्णय होऊन अतिरिक्त क्षेत्र निरंक घोषित केले असलेस सदरचे प्रकरण आपल्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे काय ? याबाबत युएलसी कार्यालयास या कार्यालयाकडील पत्र क्र.पमअ/एनए/एसआर/३०७/१३, दि.२४/९/२०१३ अन्वये सदर स.नं. बाबत तात्काळ अभिप्राय सादर करण्यास कळविणेत आलेले होते. त्या अनुषंगाने अभिप्राय प्राप्त झालेला नाही. तथापि या कार्यालयाकडे पुणे नागरी समुह कार्यालयाने त्यांचेकडील पत्र क्र. युएलसी/सीए-२/१६१९/२००७,दि.०१/११/२००७ अन्वये पुणे नागरी समुहातील समाविष्ठ गावातील ज्या सर्व्हे/गट क्रमांकाच्या क्षेत्रासाठी युएलसी कायदा कलम ६ अन्वये विवरणपत्र दाखल होऊन कलम १०(३), १०(५) अन्वये कार्यवाहीबाबतची यादी व सीडी या कार्यालयास पाठविलेली आहे. त्या यादी व सीडीनुसार प्रश्नाधिन सर्व्हे क्रमांक ४५/१ बाबत क्षेत्र अतिरिक्त घोषित केलेले नसल्याचे नमूद आहे. याबाबत शासनाचे नगर विकास विभागाचे पत्र क्र.नाजक-२२११/प्र.क्र.१३८/ नाजकधा-२, दिनांक ०७/०६/२०११ नुसार ज्या प्रकरणी युएलसी कायदा कलम १०(३), १०(५) नुसार कार्यवाही झालेली नाही अथवा ती प्रलंबित आहे त्या प्रकरणी युएलसी/नागरी समूहाकडून अभिप्राय अथवा ना हरकत घेण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच प्रश्नाधिन मिळकतीबाबत आदेश पारीत झाल्यावर देखिल पडताळणीसाठी आदेशाची प्रत पुणे नागरी समुह यांचे कार्यालयाकडे पाठविणेत येणार आहे.

तसेच दिनांक ०३ मे, २०११ रोजीचे युएलसीकडुन प्राप्त झालेली यादी व शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ७ जुन, २०११ रोजीचे पत्रानुसार, सीआयडीकडील प्राप्त पत्रे, ३० संदिग्ध प्रकरणांची यादी व बनावट/बोगस आदेशांची यादी पाहता विषयांकित जमीनीचा त्यामध्ये समावेश नाही.

सहा.संचालक नगररचना पुणे शाखा पुणे यांनी जा.क्र.रेखांकन/एनएबीपी/मौ.सुस/ ता.मुळशी/स.नं.४५/१/ससंपु/५४७०, दि.२०/९/२०१३ अन्वये बांधकाम नकाशे मंजुरीची शिफारस केली आहे.

मा.आयुक्त,पुणे विभाग,पुणे यांचेकडिल परिपत्रक क्र.मह-२/जमीन/जनरल/आरआर/७७२

/२००३, दिनांक २२/०९/२००३ मधील तरतुदीनुसार अर्जदार यांनी दिनांक १७/१०/२०१३ रोजीचे विहीत नमुन्यातील नोटराईजड करुन प्रतिज्ञापत्र व क्षतिपत्र सादर केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये विषयांकित जमिनीबाबत खालील नमुद केलेल्या कोणत्याही कायदयाच्या तरतुदीचा भंग झालेला नाही असे विशद केले आहे.

१. मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८.
२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.
३. महाराष्ट्र शेत जमीन,(जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम,१९७६.
४. इनाम जमीनी खालसा करण्यासाठीचे निर्गमित केलेले विविध कायदे.
५. मुंबई तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व जमीन एकत्रिकरण करणे अधिनियम,१९४७.
६. महाराष्ट्र खाजगी वने (भू-संपादन) अधिनियम,१९७५.
७. महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमीनी प्रत्यार्पित करणे अधिनियम,१९७४.
८. नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम,१९७६.
९. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९८६.

उपरोक्त नमुद कायदयातील तरतुदीचा भंग होत नसलेचे तसेच विषयांकित जमीन भोगावटदार वर्ग-२ पैकी नसलेचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे.

जागा पाहणी अहवाल-

सदर मिळकतीबाबतची पाहणी केली असता विषयाधीन जमीन सर्वसाधारणपणे समपातळीत असून खुली असल्याचे नमूद केलेले आहे.

मौजे-सुस, ता-मुळशी येथील स.नं. ४५/१ पै. मधील क्षेत्र २४१२८-०० चौ.मी. निवासी क्षेत्राबाबत रेखांकन नकाशे या कार्यालयाकडील आदेश क्रं.पमअ/एनएएसआर/४४/२००३, दि.२९/७/२००३ अन्वये यापूर्वी बिनशेती आकारणी रक्कम व मोजणी फी रक्कम भरलेली आहे. त्यामुळे आता बिनशेती आकारणी रक्कम व मोजणी फी भरण्याची आवश्यकता नाही. परंतु तत्कालीन आदेशावेळी सदरची जमीन पाटील वतनाची असल्यामुळे ५० टक्के नजराणा रक्कम वसुल करण्यात आलेली नसल्याचे आदेशावरुन दिसून येते. त्या अनुषंगाने अर्जदार यांना यापूर्वी निवासी प्रयोजनार्थ अकृषिक परवानगी दिलेनंतर मुदतीत वापर सुरु न केल्याने रु.१०००/- दंडाची रक्कम व ५० % नजराणा रक्कम रु.२,०८,४६,०००/- अशी एकूण रुक्कम रुपये २,०८,४७,०००/- दिनांक १३/१२/२०१३ रोजी शासकीय कोषागार अधिकारी पुणे येथे जमा करुन चलन सादर केलेले आहे.

वरील परिस्थिती विचारात घेता, अर्जदार यांना निवासी वापरासाठी बांधकामास परवानगी मिळणेस पात्र आहेत.म्हणून,महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रदान करणेत आलेल्या शक्तीनुसार मी, विकास देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे अर्जदार श्री.हरिष रावजी पाटील व इतर तर्फे कु.मु.धा.मे. हायसिज प्रॉपर्टीज प्रा.लि. तर्फे भागीदार श्री अतुल हेमराज मुंदडा व राहूल हेमराज मुंदडा यांना मौजे-सुस, ता.मुळशी येथील स.नं.४५/१ क्षेत्र २४१२८-०० चौ.मी. पैकी रस्त्याखालील क्षेत्र २२४-१७ चौ.मी. वजा जाता उर्वरित २३९०३-८३ चौ.मी. निवासी क्षेत्रास सहा.संचालक नगररचना पुणे शाखा पुणे यांजकडील जा.क्र.रेखांकन/एनएबीपी/मौ.सुस/ता.मुळशी/स.नं.४५/१/

ससंपु/५४७०, दि.२०/०९/२०१३ मधील शिफारसीस अधिन राहून खालील कोष्टकात नमूद मिळकतीवर निवासी क्षेत्रास बांधकाम नकाशांना मंजूरी देण्यात येत आहे.

बांधकाम नकाशे मंजुर करावयाच्या जमिनीचे वर्णन

अ.क्रं.	जमीनीचे मुद्दे	जमिनीबाबतचा तपशिल
१	गावाचे नाव, तालुका	मौजे सुस, ता मुळशी
२	सर्व्हे नंबर	४५/१
३	बांधकाम नकाशात समाविष्ठ केलेले क्षेत्र	२४१२८-०० चौ.मी.
४	रस्ता रुंदीने बाधित क्षेत्र	२२४-१७ चौ.मी.
५	बांधकाम परवानगीचे निवासी क्षेत्र	२३९०३-८३ चौ.मी.
६	बांधकाम परवानगीचे प्रयोजन	निवासी

बांधकाम आराखडयातील नकाशांचा तपशिल

अ.क्र.	नकाशे क्रमांक	नकाशाचा तपशिल
१	१/१५	लेआऊट प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
२	२/१५	विंग क्र. बी मधील पार्किंग, पहिला, तिसरा, पाचवा, सातवा व नवव्या मजल्याचे प्लॅन
३	३/१५	विंग क्र बी मधील दुस-या, चौथ्या, सहाव्या, आठव्या व दहाव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
४	४/१५	विंग क्र बी मधील अकराव्या व बाराव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
५	५/१५	विंग क्र बी मधील टेरेस प्लॅन, सेक्शन व इलिव्हेशन
६	६/१५	विंग क्र सी मधील पार्किंग, पहिला, तिसरा, पाचवा, सातवा व नवव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
७	७/१५	विंग क्र सी मधील दुस-या, चौथ्या, सहाव्या, आठव्या व दहाव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
८	८/१५	विंग क्र सी मधील अकराव्या व बाराव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
९	९/१५	विंग क्र सी मधील टेरेस प्लॅन, सेक्शन व इलिव्हेशन
१०	१०/१५	विंग क्र डी मधील पार्किंग, पहिल्या मजल्याचे प्लॅन, इलिव्हेशन, क्षेत्र विवरण तपशिल
११	११/१५	विंग क्र.डी मधील पार्किंग, दुस-या मजल्याचे प्लॅन, टेरेस प्लॅन, सेक्शन
१२	१२/१५	विंग क्र ई मधील पार्किंग, पहिला, तिसरा, पाचवा, सातवा, नवव्या व अकराव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
१३	१३/१५	विंग क्र ई मधील दुस-या, चौथ्या, सहाव्या, आठव्या, दहाव्या व बाराव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल

१४	१४/१५	विंग क्र ई मधील टेरेस प्लॅन, सेक्शन व इलिव्हेशन
१५	१५/१५	क्लब हाऊसचा सविस्तर बांधकाम नकाशा

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>नकाशा क्र.</th><th>इमारत क्र. / विंग क्र.</th><th>इमारतीची उंची</th><th>मजल्यांची संख्या</th><th>सदनिका संख्या</th><th>रिफ्युज एरिया</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>१/१५</td><td>-------</td><td>---------</td><td>----------</td><td>-------</td><td>--------</td><td>लेआऊट प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल</td></tr>
<tr><td>२</td><td>२/१५</td><td rowspan="4">विंग क्र बी</td><td rowspan="4">३७.२०</td><td rowspan="4">बेसमेन्ट + पार्किंग + १२ मजले</td><td rowspan="4">६६</td><td rowspan="4">आठव्या मजल्यावर १२२-९२ आठ</td><td>इमारत क्र. बी मधील पार्किंग, पहिला, तिसरा, पाचवा, सातवा व नवव्या मजल्याचे प्लॅन</td></tr>
<tr><td>३</td><td>३/१५</td><td>इमारत क्र. बी मधील दुसऱ्या, चौथ्या, सहाव्या, आठव्या व दहाव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल</td></tr>
<tr><td>४.</td><td>४/१५</td><td>इमारत क्र. बी मधील अकराव्या व बाराव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल</td></tr>
<tr><td>५.</td><td>५/१५</td><td>इमारत क्र. बी मधील टेरेस प्लॅन, सेक्शन व इलिव्हेशन</td></tr>
</table>

६.	६/१५	विंग क्र.सी	३७.२०	बेसमेन्ट + पार्किंग + १२ मजले	६६	आठव्या मजल्यावर १२२-९२	इमारत क्र. सी मधील पार्किंग, पहिला, तिसरा, पाचवा, सातवा व नवव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
७	७/१५						इमारत क्र. सी मधील दुसऱ्या, चौथ्या, सहाव्या, आठव्या व दहाव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
८	८/१५						इमारत क्र. सी मधील अकराव्या व बाराव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
९	९/१५						इमारत क्र. सी मधील टेरेस प्लॅन, सेक्शन व इलिव्हेशन
१०	१०/१५	विंग क्र डी	८.५५	बेसमेन्ट + पार्किंग + २ मजले	१२	---------	इमारत क्र डी मधील पार्किंग, पहिल्या मजल्याचे प्लॅन, इलिव्हेशन,

							क्षेत्र विवरण तपशिल
११	११/१५	विंग क्र.डी	८.५५	बेसमेन्ट + पार्किंग + २ मजले	१२	---------	इमारत क्र डी मधील पार्किंग, दुस-या मजल्याचे प्लॅन, टेरेस प्लॅन, सेक्शन
१२	१२/१५	विंग क्र ई	३७.२०	बेसमेन्ट + पार्किंग + १२ मजले	६६	आठव्या मजल्यावर १२२-९२	इमारत क्र ई मधील पार्किंग, पहिला तिसरा, पाचवा, सातवा, नवव्या व अकराव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
१३	१३/१५						इमारत क्र ई मधील दुस-या, चौथ्या, सहाव्या, आठव्या दहाव्या व बाराव्या मजल्याचे प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
१४	१४/१५						इमारत क्र ई मधील टेरेस प्लॅन, सेक्शन व इलिव्हेशन
१५	१५/१५	क्लब हाऊस	४.२०	तळ मजला	---------	----------	तळ मजला बांधकाम नकाशा, सेक्शन व एलीव्हेशन

अटी व शर्ती

१. सदरची परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम १८ व त्याखालील नियमान्वये देणेत येत आहे.
२. रेखांकनातील भूखंड/इमारती हे प्रादेशिक योजना तसेच प्रचलित नियमावलीतील निवासी विभागामध्ये अनुज्ञेय असलेल्या कारणांसाठीच वापरणे आवश्यक आहे.
३. येथे कोणतेही विकास कार्य सुरु करण्यापूर्वी हे रेखांकन जागेवर आखून भूमि अभिलेख खात्याकडुन प्रमाणित करून घ्यावे लागेल. रेखांकन जागेवर आखलेवर, भूखंडाचे किमान क्षेत्रफळ, नकाशावर दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. तसेच रस्त्यांची रुंदी, १५ % सुविधा जागा व १० % खुल्या जागेचे क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता उपयोगी नाही. यामध्ये काही फेरफार झाल्यास अभिन्यास पुन्हा मंजूर करून घ्यावा लागेल.अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत या कार्यालयाकडे सादर करून त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करणेत येऊ नये.
४. रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी भूखंड/सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.
५. अभिन्यासातील रस्ते व खुली जागा यांची देखभाल अर्जदाराने करावयास हवी. अन्यथा ते देखभाल करण्यासाठी सुयोग्य प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावेत. या जागा व रस्ते सर्व जनतेच्या वापरासाठी खुले असतील. तसेच रस्ते शेजारच्या जमीन मालकास वापरण्यास खुले ठेवले पाहिजेत.
६. वरील जागेचा व नियोजित इमारतीचा वापर रहिवास वापरासाठी करण्यात यावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.
७. सुधारित बांधकामातील मजल्यांची संख्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे बेसमेन्ट + पार्किंग + १२ मजले या पेक्षा जास्त असू नये.
८. स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर असली पाहिजेत व त्याखालील जागा कायम खुली ठेवावी.
९. सुधारित बांधकामाचे, भूखंडातील अस्तित्वातील अन्य बांधकाम धरून एकुण क्षेत्र, सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजना रस्ते/रस्तारुंदीक्षेत्र वगळता, उर्वरीत निव्वळ क्षेत्राच्या बांधकाम नकाशा बरची दर्शविलेली इतके प्रत्यक्ष जागेवर कमाल राहिले पाहिजे.
१०. सुधारित इमारती मध्ये १/८ रुमच्या क्षेत्राइतके वायुविजन उपलब्ध होण आवश्यक राहील.
११. सुधारित इमारतीसाठी/विकासासाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास, प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदारने केली पाहिजे.
१२. सुधारित बांधकामात मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
१३. प्रस्तावासोबत दिनांक २१/११/२००९ रोजी मो.र.नं.१७६४/२००९ ने केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे अधिन राहुन सदरची शिफारस करणेत येत आहे.विषयाधीन जमीनीचे वहीवाटीचे/हद्दीचे अनुषंगाने काही वाद/न्यायालयीन वाद उद्भवलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी ही अर्जदार यांची राहील. प्रस्तुत प्रकरणी सादर मोजणी नकाशाबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास सदरची अकृषिक परवानगी आपोआप रद्द होईल.
१४. जागेच्या हद्दी क्षेत्र व मालकी हक्काची छाननी, सहहिस्सेदारांचे संमतीपत्राबाबत अर्जदार जबाबदार राहतील.

१५. सुधारित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणाच्याही वहीवाटीचे हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार/मालकाने घेतली पाहीजे.

१६. विषयांकित रेखांकन व बांधकाम नकाशांची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे.(उदा. ७/१२ उतारे,संमत्तीपत्र,मोजणी नकाशा इ.) या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत अर्जदार जबाबदार राहतील.

१७. विषयांकित बांधकाम नकाशाची छाननी, अनुज्ञेय चटई क्षेत्र, भुव्याप्त क्षेत्र याबाबतीत केलेली आहे. बांधकाम नकाशातील गणितीय चुका वा जागेवर बांधकाम नकाशावर नमुद केल्या व्यतिरिक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबंधित वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.

१८. जागेतील/जागेलगतच्या नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल, असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही व नाल्यास सुयोग्य मजबुतीकरण करणे आवश्यक राहील. तसेच नाल्याच्या हद्दीवर कुंपन भिंतीचे बांधकाम करता येणार नाही त्याकरीता बिनशेती आदेशानुसार मोजणी होऊन विषयाधीन जमिनीच्या हद्दी अंतिम झालेनंतर स्वतंत्र प्रस्तावाव्दारे कुंपन भिंतीची बांधकाम परवानगी घेणे आवश्यक राहील.

१९. स्टिल्ट भविष्यात बंदिस्त करण्यात येऊ नये तसेच स्टिल्टचा वापर फक्त पार्किंगसाठीच करण्यात यावा.

२०. प्रादेशिक योजनेतील ३०.०० मी. रुंद रस्त्याच्या रस्तारुंदीने बाधित क्षेत्र सार्वजनिक वापरासाठी कायमस्वरुपी खुले ठेवणे आवश्यक राहील व समुचित प्राधिकरणाने ही जागा मागणी केल्यानंतर ती विनातक्रार, प्राधिकरणाच्या ताब्यात देणे अर्जदारावर बंधनकारक राहील. अस्तित्वातील रस्त्याखालील क्षेत्राचा चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होणार नाही.

२१. या कार्यालयाकडील आदेश क्रं.पमअ/एनएएसआर/४४/२००३, दि.२९/७/२००३ अन्वये देणेत आलेल्या अकृषिक परवानगीमधील रेखांकन नकाशे रद्द समजण्यात यावेत.

२२. सादर प्रस्ताव हा समुहगृह बांधणी योजना प्रकारातील असून सुविधा क्षेत्र वजा जाता उर्वरित क्षेत्राचे निव्वळ क्षेत्र म्हणजे ०.७५ इतके चटई क्षेत्र विचारात घेतले आहे. भविष्यात सुविधा क्षेत्र व अंतर्गत रस्ते याकरिता आवश्यक पूर्तता करुन चटई क्षेत्र अपेक्षिलेस ते सुविधा क्षेत्राचे चटई क्षेत्रासह ०.९० इतके मर्यादेत अनुज्ञेय होईल.

२३. रेनवॉटर हार्वेस्टिंग बाबतची यंत्रणा अर्जदार यांनी इमारतीचे वापरापूर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

२४. सौर ऊर्जेवर पाणी तापविण्यासाठीची यंत्रणा अर्जदार यांनी इमारतीचे वापरापूर्वी स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच शक्यतर सौर ऊर्जेवर रस्त्याच्या पथदिवे बसविण्याचे आहेत.

२५. वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट यंत्रणा स्वखर्चाने अर्जदार यांनी करावयाची आहे व पाण्याचा फेर वापर बगीचा,झाडाची जोपासना यासाठी करणे आवश्यक आहे.

२६. विघटन होणाऱ्या ओल्या कचऱ्यासाठी गांडूळखत प्रकल्प अर्जदार यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे.

२७. सदर प्रस्तावाखालील जमिनीमध्ये प्रस्तावित बांधकामाचे क्षेत्र २५३०३-९३ चौ.मी. आहे. सबब राज्यस्तरीय State Environment Impact Assessment Authority कडून Environmental Clearance चे क्र.SEAC-२०११/CR-७०/TC-२, दि.१८/५/२०१३ रोजीचे पर्यावरण विभागाकडील नाहरकत प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यातील अटी व शर्ती अर्जदार यांना बंधनकारक राहतील.

२८. शासन नगर विकास विभागाकडील परिपत्रक्र क्र.टिपीव्ही-४३०८/४१०२/प्र. क्र.३५९/०८/नवि-११ नुसार दि.१९/११/२००८ नुसार बांधकाम नकाशामध्ये प्रत्येक सदनिकेचे एकुण चटई क्षेत्र नमूद केलेले आहे. याबाबत गणितीय चुका इ.बाबत वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.

२९. सदर भुखंडाचे बांधकाम क्षेत्रफळ ५००-०० चौ.मी.पेक्षा जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक ८०-०० चौ.मी. क्षेत्रासाठी एक झाड याप्रमाणे वृक्षलागवड करणे व जोपासना करणे बंधनकारक राहील.

३०. सदर प्रकल्पातील नियोजित बांधकाम विकासासाठी स्टक्चरल इंजिनिअर श्री.पराग चोपडा, पुणे यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांनी लेटर हेडवर हमी पत्र सादर केले आहे. त्यामध्ये त्यानी नमूद केल्यानुसार नियोजित बांधकामाच्या स्थिरतेबाबत, बांधकामाबाबतचा दर्जा व गुणवत्तेबाबत संपूर्ण जबाबदारी स्ट्रक्चरल इंजिनिअर यांच्यावर राहील असे नमूद केले आहे.

३१. प्रस्तुत प्रकणातील जमीनीवर कोणतेही बांधकाम सुरु केले नंतर जोते तपासणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय पुढील बांधकाम करता येणार नाही व सदरचे बांधकाम पूर्ण झालेनंतर वापर सुरु करणेपूर्वी वर नमूद सर्व अटींची पूर्तता करुन भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार कारवाईस पात्र राहील.

३२. उक्त बिनशेतीसाठी प्रस्तावित जागेचे अथवा ग. नं. मधील उर्वरित जागेचे तकडे पाडुन अथवा गुंठेवारी प्रमाणे अनाधिकृतरित्या भूखंड पाडता येणार नाहीत किंवा विक्री करता येणार नाही. अशाप्रकारे अनाधिकृतरित्या तुकडे पाडल्यास किंवा विक्री केल्यास ही परवानगी रद्द समजण्यात येईल.

३३. १५ मी पेक्षा जास्त उंचीच्या इमारतीबाबत -

a. `अ` वर्ग नगरपरिषदेच्या प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्रं.१३.४ (ii) नुसार प्रस्तावित इमारतीसभोवताली ६ मी. रुंदीचे पाथवे किमान ४५ टन वजनाचे फायर इंजिनचा भार पेलु शकेल याप्रमाणे डिझाईन करुन विकसित करणेची जबाबदारी विकासकर्त्याची/अर्जदाराची राहील.

b. अर्जदारांनी प्रस्ताविल्यानुसार सर्व उंच इमारती स्टिल्ट वर असणे आवश्यक राहील त्याचबरोबर वाहनतळ सुविधा शासनाने दि.२८.८.२००९ च्या नोटिसी अन्वये अंतिम केलेल्या नियमानुसार प्रस्तावित करणे आवश्यक राहील.

c. नगर विकास विभागाच्या दि.२८.८.२००९ रोजीच्या अधिसुचना प्रमाणे नियम क्रं.४ मधील टीप-ii प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी १५ मी पेक्षा उंच इमारतीच्या नियोजनातील जिन्याचे व लिफ्टचे स्थान मान्य केलेले आहे. तथापि या कार्यालयाकडून मंजुरीसाठी शिफारस केलेल्या याबाबतचे नियोजनानुसार इमारतीचे नियोजनात बदल करणे आवश्यक झाल्यास पुन्हा मुख्य अग्निशमन अधिकारी यांची नव्याने मंजुरी घ्यावी लागेल. तथापि प्रस्तुत प्रकरणी सादर बांधकाम नकाशांची छाननी करता अर्जदारांनी, अग्निशमन अधिकारी यांनी Provisional Fire N.O.C. सोबत दिलेल्या जिन्याचे व लिफटचे स्थानामध्ये बदल केला आहे. सबब अशा बदलानुषंगाने जागेवर प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करणेपूर्वी या बदलानुषंगाने संबंधीत महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडून सुधारित Provisional Fire N.O.C. घेणे बंधनकारक राहील व सदरचे N.O.C. जोता तपासणी वेळी सादर करणे जरुरीचे आहे. तसेच प्रत्येक इमारतीमधील एक स्टेअरकेस व एक लिफ्ट NBC मधील तरतुदीप्रमाणे फायर रेजिस्टन्ट असणे आवश्यक आहे. तसेच उंच इमारतीचे नियोजना अनुषंगाने मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे महानगरपालिका पुणे यांनी दि.१०/७/२०१३ चे पत्र क्रं.FB/९३० ने दिलेल्या

Provisional Fire N.O.C. मधील अटी/शर्तीची पुर्तता करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

d. `अ` वर्ग नगरपरिषदेच्या प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्रं.६.२, ६.१ नुसार बाबींची पूर्तता तसेच अग्निप्रतिबंधकन उपाययोजनाबाबत परिशिष्ठ पी मधील बाबींची पूर्तता करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

e. नेहमीच्या वापराशिवाय अग्निप्रतिबंधक व्यवस्थेकरीता,पाणीपुरवठा, जलनिस्सारण, सांडपाणी, कचरा विल्हेवाट, इत्यादी बाबीची पुर्तता अर्जदाराने स्वखर्चाने,स्वजबाबदारीवर करणे आवश्यक राहील.

f. `अ` वर्ग नियमावलीतील नियम क्रं.१८.१ नुसार लिफ्टची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

g. अशा विकासासाठी इमारतीचे Strructural Stability बाबत शासनाच्या नोंदणीकृत Strructural Engineer चे प्रमाणपत्र अर्जदाराने जोता तपासणीपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात व सहा संचालक नगररचना पुणे या कार्यालयात दाखल करणे आवश्यक राहील. तसेच अशा इमारतीचे Strructural Design हे भुकंप प्रतिबंधक असणे आवश्यक राहील.

h. विकासकाने जोत्यापर्यतचे बांधकामा केल्यानंतर जिल्हाधिकारी पुणे यांना कळविणे आवश्यक आहे. जोत्यापर्यंतच्या बांधकामाना जिल्हाधिकारी पुणे यांनी प्रमाणित केल्यानंतर पुढील बांधकाम करावे. तसेच त्यांनतरसुध्दा बांधकाम परवानगीनुसार सुरु आहे किंवा कसे यांची शहानिशा जिल्हाधिकारी पुणे यांना करता येईल. जोत्याचे बांधकाम तसेच प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अथवा वेळोवेळी असे बांधकाम/इमारतीची तपासणी करण्याकरीता उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार यांना सूचना द्याव्यात. तसेच जिल्हाधिकारी पुणे किंवा त्यांचे प्रतिनिधींनी, सहायक संचालक, नगररचना पुणे यांचे कार्यालयातील तांत्रिक अधिकारी यांचे मदतीने अशा इमारतीचे बांधकाम दिलेल्या परवानगीनुसार व अटीनुसार सुरु असल्याची खातरजमा करावी.

i. अशा इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे व असे भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी सर्व:- अग्नीशमन यंत्रणेची पूर्तता व वर नमूद अटींची पूर्तता होणे आवश्यक राहील.

j. विषयाधीन जागेवर, विषयाधीन जमिनीचा स.नं./ग.नं.निहाय तपशिल, जमिन मालकाचे नाव, विकासकाचे नाव, वास्तुशिल्पीचे नाव, बिनशेती परवाना क्रमांक, इत्यादी आशय दर्शविणारा योग्य आकाराचा फलक लावणे आवश्यक राहील.

३४. विषयांकित प्रकरणी उंच इमारतीच्या अनुषंगाने रिफ्युज एरियाची स्पष्टता ८ व्या मजल्यावरती दर्शविलेली असून तो रस्त्याचे बाजूस दर्शविणे आवश्यक आहे. तसेच रिफ्युज एरिया बंदिस्त करता येणार नाही व त्यांची विक्री करता येणार नाही. याबाबतचे उल्लंघन झाल्यास सदरची शिफारस रद्द समजण्यात यावी.

३५. सदर जागेस दर्शविलेला पोहोच रस्ता अर्जदार यांच्या जागेतील असल्याने त्यांनी दि.८/८/२०१३ रोजीचे नोंदणीकृत नोटराईज संमतीपत्र अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील. सदर पत्रामध्ये भविष्यात वाद उद्‌भवल्यास सदरची शिफारस रद्द समजण्यात यावी. सदर संम्मतीपत्राची मूळ प्रत सोबत संलग्न करीत असून फोटोकॅफी अभिलेखी ठेवण्यात आलेली आहे.

३६. अर्जदारानी सादर केलेली माहीती खोटी अथवा दिशाभूल करणारी आढळल्यास सदरची मंजूरी रद्द समजणेत येईल.

३७. अर्जदार यांनी जमीनीचा वापर त्यावरील इमारतीसह ज्या कारणासाठी दिला आहे, त्याच कारणासाठी करावा. जमीनीचा वापर अन्य कारणासाठी करावयाचा झाल्यास या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

३८. अर्जदार यांनी प्रतिवर्षी विषयांकित निवासी मिळकतीसाठी रु.००.१०/- प्रती चौ.मी. या दराने अकृषिक सारा शासनास भरावा. सदर आकारणी तात्पुरत्या स्वरुपाची असून दिनांक १/८/२००६ ते सुधारित अकृषिक प्रमाणदर अंमलात आल्यानंतर फरकाची रक्कम असलेस ती शासनास जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३९. प्रस्तुत जमीनीवर भविष्यात नजराणा रक्कम, अकृषिक सा-यांची फरकाची रक्कम, तडजोड शुल्क अशी काही शासकीय रक्कमेची बाकी उद्‌भवल्यास उपरोक्त रक्कमा भरणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

४०. प्रस्तुत जमीनीवर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने अकृषीक आकारणी दरवर्षी भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

४१. सदरच्या आदेशातील अकृषिक क्षेत्र व अकृषिक सारा यामध्ये उपअधीक्षक भूमी अभिलेख मुळशी यांचेकडून प्रत्यक्ष मोजणी नंतर जो फेरबदल होईल तो करण्यास पात्र राहील.

४२. सदर आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्यास अर्जदार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्याखालील नियमानुसार दंडास पात्र राहील तसेच दिलेली अकृषिक परवानगी रद्द समजणेत येईल.

४३. अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती, शपशपत्र व बंधपत्र, हमीपत्र तसेच प्रतिज्ञापत्रात नमुद केलेली बाब अथवा कागदपत्रे ही चुकीची अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास प्रस्तुतची परवानगी रद्द समजणेत येईल.

जिल्हाधिकारी पुणे

(विकास देशमुख)
जिल्हाधिकारी, पुणे.

प्रति,

श्री.हरिष रावजी पाटील व इतर तर्फे
कु.मु.धा. मे हायसिज प्रॉपर्टीज प्रा लि तर्फे भागीदार
श्री अतुल हेमराज मुंदडा व इतर,
रा.पर्वती चेंबर्स, संगम प्रेस रोड, १६/१,
कोथरुड, पुणे -३८.